

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

*********************************************************

**सूचना** दि. 02 / 08 / 2019

विवेकानंद कॉलेजच्या इतिहास विभागातील बी. ए. भाग - II च्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना सुचित करण्यात येते की, सोमवार दिनांक 05/08/2019 रोजी IDS HSRM पेपर क्रमांक –I "महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास " या विषयाच्या प्रकरण-1 (19 व्या शतकातील महाराष्ट्र) वरील सरप्राईज टेस्ट चे आयोजन चौथ्या तासाला रूम नंबर 17 मध्ये सकाळी 10 ते 10.45 या वेळेत केले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी तयारीनिशी टेस्टला वेळेवर उपस्थित राहावे.

3/08/19

डॉ. एस. आर. कट्टीमनी

इतिहास विभाग

94



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**************************************************************

**प्रश्नपत्रिका** दि. 05 / 08 / 2019

बी. ए. भाग - II

सेमिस्टर - III पेपर क्रमांक - I

विषय - "महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास"

प्रकरण-1 19 व्या शतकातील महाराष्ट्र

सरप्राईज टेस्ट वेळ - सकाळी 10 ते 10.45

प्रश्न - 19 व्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिती स्पष्ट करा . (गुण-10)

95



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**गुणपत्रक / मार्कलिस्ट** दि. 5/8/2019

---

वर्ग - बी.ए.- II सेमिस्टर - III

पेपर क्र - I टेस्ट - सरप्राईज टेस्ट

प्रकरणाचे नाव - महाराष्ट्रातील समाजसुधारकांचा इतिहास एकूण गुण - 10

| अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स | अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स |
|---|---|---|---|---|---|
| 1 | S256 | 8 | 10 | | |
| 2 | S098 | 9 | 11 | | |
| 3 | 4632 | 8 | 12 | | |
| 4 | S040 | 10 | 13 | | |
| 5 | S138 | 9 | 14 | | |
| 6 | S096 | 9 | 15 | | |
| 7 | S187 | 9 | 16 | | |
| 8 | | | 17 | | |
| 9 | | | 18 | | |

विषय शिक्षक स्वाक्षरी

96

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार."
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

विवेकानंद कॉलेज कोल्हापूर

Class B.A-II Date - 5/8/19 Unit test Roll No.

Suppliment No. Assignment of HSRM Subject HSRM -

Test / Tutorial No. Name:- Abhishek Sanjay Gurav 5256

प्रश्न :- एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजीक सुधारणांचे वर्गीकरण करा:

प्रस्तावना :-

इ.स. १७१३ मध्ये जन्माला आलेली पेशवाई १८१८ ला संपुष्टात आली. इंग्रजांनी शनिवारवाड्यावर 'युनियन जॅक' फडकवला आणि इंग्रजांचे महाराष्ट्रात राज्य सुरु झाले. महाराष्ट्रात आजपर्यंत कितीतरी राजकीय संघर्ष झाले. त्यातुन कितीतरी स्थितींतरे घडुन आली, पण सामाजिक दृष्टीकोनातुन विचार केला तर त्यात कोणताच बदल झालेला दिसत नव्हता. इंग्रजांचा अंमल सुरु झाला तरीदेखील महाराष्ट्रातील समाज पूर्वीसारखाच जिवन जगत होता. समाजामध्ये असणाऱ्या जाती - त्यांच्यातील भेद, अस्पृश्यता, वर्णव्यवस्था यांसारख्या समस्या अजुनही जिवंत होता. त्यामुळे राजकीय उलथापालथीचा कोणताच परिणाम महाराष्ट्राच्या सामाजीक जिवनावर झालेला दिसुन येत नाही. १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजीक परिस्थितीचा अभ्यास करताना पुढील मुद्यांचा अभ्यास करावा लागेल......

• कुटुंबपद्धती :-

भारतीय समाजाचे व्यक्ती, वर्ण, कुटुंब व जाती असे चार घटक आहेत. कुटुंबव्यवस्था ही भारतीय समाजाची एक महत्वाची संस्था आहे जगदी प्राचीन काळापासुन ती अस्तित्वात आहे. कुटुंब नेहमी संक्रमण होत आहे. त्यामध्ये एक-दोन पिढ्यांची माणसे एकत्र राहत होती. कुटुंबात एक कारभारी प्रमुख असे. कुटुंब चालवण्याची जबाबदारी असायची. कुटुंबातील इतर सदस्य त्याच्या आदेशाचे पालन करीत तसेच त्याला त्याच्या अन्य कामात मदत करत असत.

• जातिव्यवस्था :-

भारतीय हिंदु समाजव्यवस्थेमध्ये 'जातसंस्था' हा एक

महत्वाचा घटक असुन ती प्राचीन सामाजिक संस्था आहे.

हिंदु समाजव्यवस्थेचे ते अंग आहे. जे. एच. हटन यांनी 'कास्ट इन इंडिया' या ग्रंथामध्ये जातीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे: "The word cast comes from the portguese word cast". आजही भारतात अनेक जाती आहेत. त्या काही प्रत्येकाचे सामाजिक रचना ठरलेली होती. प्रत्येक जातीवर बंधने होती. जातिव्यवस्था अनेक शतकापासुन अस्तित्वात असुन महाराष्ट्रातील समाजरचना जातीवर आधारीत होती. जातिव्यवस्थेचे उतरंडीप्रमाणे श्रेणीबद्ध रचना होती. समाजात जाती - उपजाती अस्तित्वात होती. प्रत्येक जातीचे आचरण ठरलेले असल्याने समाजात एकसंघता नव्हती.

• अस्पृश्यता :-

'अस्पृश्यता' म्हणजे स्पर्श करण्यास अयोग्य. अस्पृश्यता ही जातिसंस्थेतून उदयास आलेली एक सामाजिक संस्था आहे. या जातीच्या व्यक्तीचे दर्शन व संभाषण हेही प्रायश्चित्ताहे मानले जात होते. यांनी गावाबाहेर वस्ती करावी. त्यांनी वापरलेले कोणतेही भांडे वापरू नये. प्रेताप्रमाणे त्यांना अपवित्र समजावे या विचारांचा पगडा होता. भारतातील ८०० हजार जातींपैकी ४२९ जाती अस्पृश्य मानल्या आहेत. अतिशुद्रांना अस्पृश्य मानले जात होते. महार, मांग, चांभार या अस्पृश्य जाती असल्याने त्यांना गावाबाहेर ठेवण्यात आले.

• ब्राम्हण समाजाचे प्रभुत्व :-

समाजामध्ये वर्णव्यवस्था खोलवर रुजुन त्यातुन जातिसंस्था वृक्ष फोफावला होता. ब्राम्हणांना प्राचीन काळापासुन शास्त्राने षटकर्मे नेमुन दिलेली असुन त्याचे अध्ययन, यजन, याजन, अध्यापन, दान व प्रतिग्रह यांचा समावेश होता. त्यामुळेच समाजात ब्राम्हणांचे वर्चस्व निर्माण झाले होते. त्यातच ब्राम्हणांच्या हातात सत्ता गेल्याने त्यांचे विशेष महत्व वाढले गेले.

• आहार :-

आहार हा सर्वांचा सारखा नव्हता. उच्चवर्णीयांच्या आहारात दही, दूध, तूप, गव्हाची चपाती, ज्वारी- बाजरीची भाकरी, पोळी, गोड पदार्थ, लोणचे, निरनिराळ्या पदार्थांचा रसदेखील असे.

मराठ्यांमध्ये साधारणतः बाजरीची भाकरी व डाळीची आमटी असत.
समाजात शाकाहार-मांसाहार प्रचलित होता. उत्सवाच्या व सणाच्या दिवशी पशुबळी दिला जात असे. सणाच्या दिवशी 'पुरणपोळी' केली जात असे. ज्वारीची व बाजरीची भाकरी हे प्रमुख अन्न होते.

**केशभूषा व वेशभूषा :—**

स्त्रीपुरुषांची केशभूषा व वेशभूषा साध्या स्वरूपाची होती. स्त्रियांना वेगवेगळ्या प्रकारची वेशभूषा-केशभूषा करायला आवडत असे. नखऱ्यामुरडण्याची हौस असे. सौंदर्यप्रसाधनांचा वापर केला जात असे. श्रीमंत हिंदु पुरुष 'धोतर' नेसत असत. अंगात घालायच्या कपड्यांची नावे झगा, अंगरखा, डगला, कुडते अशी होती. त्याप्रमाणे डोक्याला पगडी असे. स्त्रिया साडी-चोळी वापरत. त्याचप्रमाणे परकर, लेहंगा, जोड्या, काचोळी, लुगडी वापरत. मुस्लीम समाजातील स्त्रिया सलवार, कमीज व ओढणी अशी वेशभूषा करत.

**गुलामगिरी :—**

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात मानवतेला काळीमा फासणारी गुलामगिरीची पद्धत अस्तित्वात होती. पूर्व वैदिक काळात दासांचा वंश होता. 'दास' हा 'गुलाम' या अर्थाने वापरण्यात येऊ लागला. एकोणिसाव्या शतकातील गुलामांना वेगवेगळ्या नावाने ओळखला जात असे. उदा. दासदासी-लेकावळे, बटकी, पोरगे, कुणबिणी इ. गुलामांचे सर्व जीवन मालकाच्या मर्जीवर अवलंबुन असे. नैसर्गिक कारणामुळेच गुलामगिरीची प्रथा सुरु होती असे नव्हे, तर गुलामांचा व्यापारही चालु होता.

**स्त्रीजीवन :—**

एकोणिसाव्या शतकातील समाजव्यवस्था 'पुरुषप्रधान' होती. मालमत्तेचे अधिकार फक्त पुरुष वर्गासच होते. समाजात स्त्रीची स्थिती मात्र अत्यंत वाईट होती. स्त्रीला धर्मशास्त्र, रुढी-परंपरा, चालीरिती, यांच्या बंधनात सर्व बाजुंनी जखडवले होते. तिच्याकडे एक भोगवस्तु म्हणुन पाहिले जाई. 'चूल आणि मूल' एवढेच तिचे काम होते. या काळात स्त्रीला गुलामाप्रमाणे वागवले जात असे. बालविवाहाची प्रथा-सुद्धा अस्तित्वात होती.

विधवा विवाहास बंदी होती.

ब्राह्मण समाजातील स्त्री विधवा झाल्यास तिचे केशवपन व मुंडन करण्याची प्रथा रूढ होती. अशा विधवांना आयुष्यभर अपमानित व परावलंबी जीवन जगावे लागत असे.

**मनोरंजन :-**

समाजामध्ये वेगवेगळ्या प्रकारची मनोरंजनांची साधने होती. सर्वसामान्यांचे मनोरंजन शिकार, जुगार खेळणे, मल्लयुद्ध, झोन खेळणे बासरी वाजवणे, कोंबड्याच्या झुंजी व मेंढ्यांची टक्कर अशा माध्यमातुन होत असे. श्रीमंतांचे मनोरंजन नृत्य, संगीत, गायन, वादन वैगेरे माध्यमातुन होत असे. आनंदाच्या दिवशी पाहुण्यांच्या आगतस्वागताच्या वेळी, स्वारी गिरवणुक असेल तर अशा वेळेस वेश्यांचे नाचगान होत असे.

**अलंकार :-**

स्त्री-पुरुषांना विभिन्न प्रकारचे अलंकार वापरण्याची मोठी हौस होती. पुरुष अंगठी, कंठहार, चौकडा, कुडक्या, भिकबाळी, पदक, [illegible] पाने, त्रक, बाजुबंद वापरत असत. स्त्रीया वेणीच्या पेडात कुयरी, मच्छ, कुर्मा, बोर - चिमण्या, सीताफळ, आवळा व मोर इत्यादी अलंकार वापरत. नाकात नथ, कानात बुगडी, कापु, कर्णफुले, बाळ्या, मोकरे, कुडी, कुडक्या व कुंडले घालत. बाजुबंद व वाकी हे दंडात घालत. गोठ, तोर, कंगणे, गजरे, पाटल्या, तोडे, पोंचे, बांगड्या हे हातातील बांगड्यांचे प्रकार होते. पैंजण, गुजऱ्या, वाळ्या, तोरड्या, व सागळ्या हे हे पैंजणातील अलंकार होते. मंगळसूत्र, जोडवी, नथ, बांगड्या, हे सुवासिनीचे अलंकार त्या काळात मोठ्या प्रमाणात वापरले जात असत.

- वरील मुद्द्यांच्या आधारावरून आपल्याला असे सांगता येते की एकोणिसाव्या शतकातील समाज आधुनिक विचार व ज्ञानाअभावी मागास लेला होता. सती पद्धती, बालविवाह, विधवा विवाहास बंदी, केशवपन अशा अनिष्ठ प्रथामुळे एकोणिसाव्या शतकातील स्त्रीजीवन खालावले होते. समाजात जातिव्यवस्था, अस्पृश्यता यांसारखे अनेक दोष आढळुन येतात. त्यामुळे १८०० शतकाची सुरुवातीची काही वर्षे महाराष्ट्रातील समाज मागासलेला होता.

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class B.A II Sem Div. ... Roll No. 5098
नाव - कृष्णाली शिकांत कांबळे
Suppliment No. Subject HSRM
Test / Tutorial No.

Q.1] 19 व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती ?
→ 19 व्या शतकातील काळात महाराष्ट्रातील समाजात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्थेतील कडक निर्बंधांना विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. वैज्ञानिक दृष्टिकोण व बुद्धिप्रामाण्यवाद या पेक्षा समाजजीवनातील कडक चालीरिती, रुढी, परंपरा व ग्रंथप्रामाण्याला विशेष महत्त्व होते. धार्मिक आचार व विचारांचा प्रभाव समाजजीवनावर पडला होता. भारतीय समाजाचे ~~कडक वैशिष्ट्य म्हणजे एका गावात दोन गाव~~ हे होय. महाराष्ट्र त्याला अपवाह नव्हता. एक वेशीच्या आतील गाव आणि दुसरे वेशीबाहेरील गाव. हिंदू धर्म व धर्म मार्तंडांनी बनविलेल्या या वर्ण व जातिव्यवस्थेमुळे येथे गावेच दुभागलेली आहेत असे नाही तर माणसांची मनेसुद्धा दुभागलेली आहेत. अस्पृश्यांचे पाणवठे वेगळे समनवटे वेगळे आहेत. अस्पृश्यांना त्यांनी हिंदू मानले पण बांधव कधीच मानले नाही सामाजिक विषमता हे या काळातील हिंदू समाजरचनेचे खास वैशिष्ट्य बनले होते.

1] धार्मिक जीवन :-
या काळातील समाजजीवनावर धार्मिक आचार व विचारांचा मोठा प्रभाव होता. परंतु पेशवेकाळात धर्माची मुलभूत तत्वे बाजूला पडली होती. धार्मिक आचार, परंपरा, कर्मकांड व व्रतवैकल्ये यांना महत्त्व प्राप्त होते. हिंदू धर्माचे

शुद्ध स्वरुप नष्ट झाले होते. ~~हिंदू~~ ब्राम्हण भोजन दानधर्म, कर्मकांड यांचे महत्त्व वाढले होते. समाजात ऐतखाऊ व आळशी पुरोहितांचा वर्ग निर्माण झाला होता. उत्तर पेशवाई कालखंडात तर याचा कळस झाला. ज्योतिष, मुहूर्त, शुभाशुभ व्रते, नाम, जप, दान इत्यादिनिये स्तोम माजले व्रतवैकल्ये, नामजप अनुष्ठाने केल्याने पापक्षालन होते. या काळातील लोकांचा अनुष्ठानावर दृढ विश्वास होता. त्यामुळे लोक अनेक प्रकारची अनुष्ठाने करत. अनुष्ठानावर भरमसाट खर्च केला जात असे. समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांडे, व्रतवैकल्ये यांचा पुरोहितांनी आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेतला. अशा प्रकारे अनेक अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रद्धा अयोग्य आचार व विचार यांनी महाराष्ट्रील धार्मिक जीवन व्यापलेले होते.

2] अंधश्रद्धा व व्रतवैकल्य :-

पेशवेकाळात व्रतवैकल्यांना, भोळसट समजुती व अंधश्रद्धेला ऊत आला होता. होमे, व्रते, अनुष्ठाने, उपवास केल्याने परमेश्वराची व ग्रहांची कृपा होते ही समजुत दृढ झाली होती. मंत्रतंत्राने संकटे दुर होतात अरिष्ट टळते अशी समजुत होती. पायगुण, शकुन, अपशकुन यावर लोकांचा विश्वास होता. या काळातील समाज ग्रहणाला मोठे अरिष्ट मानत होता. ग्रहणामुळे आपल्यावर ग्रहांचा कोप होऊ नये म्हणून ग्रहण काळात लोक कुवतीप्रमाणे स्नान, दान व जप करत असत. मंत्रतंत्र, भुतबाधा, चेटुक, जारण-मारण-तारण, जादुटोणा यावर अज्ञानी लोकांचा विश्वास होता. या संदर्भात वा. कृ. भावे म्हणतात. "कोकणची भुते देशावरच्या भुतांपेक्षा जास्ती

Department of Sociology

खत्याळ होती. अशा प्रकारच्या अंधश्रद्धा त्या काळात दिसतात.

3] जातिव्यवस्था :-

19 व्या शतकाच्या प्रारंभी जातिव्यवस्थेचा, जातिसंस्थेचा समाजात मोठा प्रभाव होता. जातिव्यवस्थाही एक या समाजातील भयंकर पद्धती आहे. भारतात या जातिव्यवस्थेत हजारो जाती आहेत. त्याशिवाय शुद्र - अतिशुद्र, अस्पृश्य, आदिवासी, भटके - विमुक्त समाज अशा सामाजिक व आर्थिक दृष्ट्या अधोगतीला गेलेले समाज या जातिव्यवस्थेच्या पोटी जन्माला आले आहेत. जातीव्यवस्थेमुळे मनुष्य ज्या जातीत जन्माला आला ती त्याची जात ठरते. जातीबरोबरच त्याचा ~~धंदा ठरतो. मनुष्याची किंमत गुणावरून न~~ ठरता ती त्याच्या जन्म घेतलेल्या जातीवर ठरते. एका जातीच्या माणसाला त्याच्या जातीची कोंडी फोडून दुसऱ्या जातीत आयुष्यभर जाता येत नसे. तो ज्या जातीत जन्माला येतो, त्याच जातीत आयुष्यभर जगुन त्या जातीतच मरतो. समाजात प्रत्येक जातील सामाजिक स्थान आहे. या स्थानानुसार प्रत्येक जातिला सामाजिक हक्क, अधिकार व कर्तव्ये लाभली होती. उच्च व वरील जातींना अनेक प्रकारचे विशेषाधिकार मिळाले होते तर कनिष्ठ, नीच जातीच्या लोकांना मूलभूत मानवी हक्कापासून वंचित ठेवले होते. अशा प्रकारची 19 व्या शतकातील प्रारंभी असल्याचे दिसते.

4] वेठबिगार :-

उत्तर पेशवाईकाळात वेठबिगार पद्धत अस्तित्वात होती. अतिशुद्र जातीतील

लोकांना वेठबिगार म्हणून वापरले जाई. वेठबिगारांना सरकारी बांधकाम, रस्ते दुरुस्ती करणे, सरकारी गवत कुरणे कापणे, इनामदार, जहागिरदार, देशमुख इत्यादी महत्त्वाच्या वतनदारांच्या घरी वेठबिगार असत त्यांच्याकडून सर्व प्रकारची कामे करून घेतली जातात. छत्रपती, पेशवे, सरदार जेव्हा प्रवास, शिकार व तीर्थक्षेत्रास जात तेव्हा त्यांच्या प्रवासांची सामानाची साहित्याची, जेवणखान व पाण्याची सोय करण्यासाठी कुंभार, सुतार, गुरव व लोहार इत्यादी जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून राबवले जात असत.

5] दास - दासी :-

पेशवाई काळात महाराष्ट्रात दास-दासींची पद्धत अस्तित्वात होती. दास-दासींना साधारणतः गुलामाप्रमाणे वागविले जात. दासांना 'पोरगे' म्हणत तर दासींना 'कुणबीण' म्हणत. घरगुती कामासाठी दास-दासींना ठेवत असत. पेशवे काळात दासाची (पोरग्याची) किंमत 125-150 होती. दासीची (कुणबिणीची) किंमत 60-70 रु होती. दास-दासींना मोबदला देऊन पर्यायी व्यक्ती देऊन मुक्तता करून घेता येत असे. दास-दासी म्हातारे झाल्यानंतर मालक त्यांची दास्यातून मुक्तता करीत असत.

Department of Sociology
Vivekanand College
Kolhapur.



6] स्त्रीजीवन :-

19 व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रातील समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान होती. मालमत्तेचा अधिकार फक्त पुरुषालाच होता. मात्र या काळात स्त्रियांची स्थिती मात्र अत्यंत वाईट व करुणाजनक होती. स्त्री जीवन हे धर्मशास्त्रे, रुढी, परंपरा चालीरिती यांच्या बंधनात सर्व बाजुंनी जख- ~~डले गेले होते. बंदिस्त झाले होते.~~ चुल व मुल हीच तिची मुलभुत कर्तव्ये ठरविली होती. या काळातील स्त्रीयांविषयीच्या वाईट चालीरिती रुढी, परंपरा थोडक्यात पुढीलप्रमाणे :-

अ] सती पद्धती :-

सती पद्धती म्हणजे स्त्रीजीवना- ला मोठा शाप होता. पेशवेकाळात या पद्ध- तीला प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. सतीची चाल म्हणजे माणुसकीला काळीमा फासणारी पद्धत होती. पेशवेकाळात सतीच्या प्रथेस प्रोत्साहन मिळाले. 10-12 वर्षांच्या मुलीमुलांना- सुद्धा सती जावे लागे. काही वेळा सती जाण्यास जबरदस्ती केली जात.

ब] बालविवाह :-

पेशवाईत सर्रास बालविवाह होत असत. मुलगी ८ ते ९ वर्षांच्या पुढे लग्नाशिवाय राहिल्यास पेशवाईत अधर्म मानला जात असे. मुलाच्या लग्नाचे वय १२-१३ वर्षांचे असे पण पुरुष युद्धात साथीच्या रोगात मृत्यु पावल्यास त्या मुलीस सर्व आयुष्य विधवा अवस्थेत घालवावे लागे.

क] विधवा विवाहास बंदी :-

ब्राम्हण समाज व ९६ कुळी क्षत्रिय मराठा यांच्यात विधवांच्या विवाहास बंदी होती. शुद्र व अतिशुद्र समाजात विधवांच्या विवाहाला परवानगी होती.

ड] केशवपन :-

ब्राम्हण समाजात विधवा स्त्रीचे केशवपन व मुंडन करण्याची प्रथा सुरु होती. केशवपन केल्याने ती विद्रुप दिसावी हा हेतू होता. त्या विधवेस परावलंबी व अपमानीत जीणे आयुष्यभर जगावे लागत असे.

इ] बहुपत्नीकत्व :-

१९ व्या शतकातल्या प्रारंभी बहुपत्नीकत्त्वाची चाल मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. सरदार, जहागिरदार, वतनदारां-च्यात ही प्रथा सर्रास सुरु होती. त्यामुळे पुरुष कोणत्याही वयात कितीही लग्ने करीत असत. विवाहबाह्य संबंध ठेवण्यास पुरुषांना परवानगी

होती. अंगवस्त्र ठेवण्यासही मान्यता होती.

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

8/10

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class B.A.II Div Date [illegible] 19 tical Roll No. 4632

Suppliment No. Subject HSRM

Name- Test / Tutorial No. Pallavi Yashwant Kamble.

① एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीची महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती स्पष्ट करा.

प्रस्तावना - 19

19 व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणांच्या चळवळीचा इतिहास पाहण्यापूर्वी 19 व्या शतकाच्या प्रारंभी येथील समाजजीवनाचे स्वरूप काय होते हे पाहणे आवश्यक ठरते. ते अभ्यासल्याशिवाय समाजसुधारणेच्या चळवळीच्या इतिहासाचे आकलन होत नाही. या काळात महाराष्ट्रातील समाजात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्थेतील कडक निर्बंधांना विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. वैज्ञानिक दृष्टिकोन व बुद्धिप्रामाण्यवाद यापेक्षा समाजजीवनातील चालीरीती, रुढी, परंपरा व ग्रंथप्रामाण्याला विशेष महत्त्व होते. धार्मिक आचार व विचारांचा प्रभाव समाजजीवनावर पडला होता.

① धार्मिक जीवन -

या काळातील समाजजीवनावर धार्मिक आचार व विचारांचा मोठा प्रभाव होता. परंतु पेशवेकाळात धर्माची मूलभूत तत्त्वे बाजूला पडली होती. धार्मिक आचार, परंपरा, कर्मकांड व व्रतवैकल्ये यांना महत्त्व प्राप्त झाले होते. हिंदू धर्माचे शुद्ध स्वरूप नष्ट झाले होते. ब्राह्मण भोजने, दानधर्म, कर्मकांड यांचे महत्त्व वाढले होते. समाजात ऐतखाऊ व आळशी पुरोहितांचा वर्ग निर्माण झाला होता. उत्तर पेशवाई कालखंडात तर याचा कळस झाला. ज्योतिष, मुहूर्त, शुभाशुभ व्रते, नाम, जप, दान इ. स्तोम माजले. व्रतवैकल्ये, नामजप, अनुष्ठाने केल्याने पापक्षालन होते. देवदेवतांची कृपा होते असा विचार रूढ झाला.

धर्मगुरु, शास्त्री, पंडित या उच्च वर्गीयांनासुद्धा खऱ्या धर्मा व धर्मतत्त्वांचा विसर पडला होता. धर्माच्या नावाखाली सर्वत्र अधर्म माजला होता. तंत्र-मंत्र, जादूटोणा, भूतपिशाच विद्या यांना या काळात विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.

② अंधश्रद्धा व व्रतवैकल्ये -

पेशवेकाळात व्रतवैकल्यांना, भोळसट समजुती व अंधश्रद्धेस ऊत आला होता. दान, प्रतिअनुष्ठाने, उपवास केल्याने परमेश्वराची व ग्रहांची कृपा होते ही समजूत दृढ झाली होती. मंत्रतंत्राने संकटे दूर होतात. अरिष्ट टळते अशी समजूत होती. व्रतांची नावे ती करण्याची पद्धत व त्यांची फळे यासंबंधीचे व्यापक उल्लेख मराठी कागदपत्रात मिळतात. पायगुण, शकुन अपशकुन, यावर लोकांचा विश्वास होता. या काळातील समाज ग्रहणाला मोठे अरिष्ट मानत होता. ग्रहणामुळे आपल्यावर ग्रहांचा कोप होऊ नये म्हणून ग्रहण-काळात लोक कुवतीप्रमाणे स्नान, दान व जप करत असत. मंत्रतंत्र, भूतबाधा, चेटूक, जारण मारण-तारण, जादूटोणा यावर अज्ञानी लोकांचा विश्वास होता.

③ जातिव्यवस्था -

१९ व्या शतकाच्या प्रारंभी जातिव्यवस्थेचा, जातिसंस्थेचा समाजात मोठा प्रभाव होता. जातिव्यवस्था ही एक या समाजातील भयंकर पद्धती आहे. माणसाच्या जीवनावर सर्व प्रकारचा प्रभाव पाडून त्याचे नियंत्रण ही करते. भारतात या जातिव्यवस्थेत हजारो जाती आहेत. त्याशिवाय शुद्र- अतिशुद्र, अस्पृश्य, आदिवासी, भटके विमुक्त समाज अशा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अधोगतीला गेलेले समाज या जातिव्यवस्थेच्या पोटी जन्माला आले आहेत. या जातिव्यवस्थेला धर्मशास्त्रांचा, स्मृती व पुराणांचा आधार होता. त्यामुळेच जातिव्यवस्थेने माणसाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावर पोलादी पकड ठेवून कडक नियंत्रण ठेवले होते. जातिव्यवस्थेमुळे मनुष्य ज्या जातीत जन्माला आला ती त्याची

जात असते. जातीबरोबरच त्याचा धंदा ठरतो. मनुष्याची किंमत गुणावरून न ठरता ती त्याच्या जन्म घेतलेल्या जातीवर ठरते. एका जातीच्या माणसाला त्याच्या जातीची कोंडी फोडून दुसऱ्या जातीत जाता येत नसे. तसेच त्याला त्याच्या जातीचा धंदा सोडून दुसऱ्या जातीचा धंदाही करता येत नसे. तो ज्या जातीत जन्माला येतो, ~~स्वत~~ त्याच जातीचा आयुष्यभर जगून त्या जातीतच मरतो. जातिसंस्थेने वैशिष्ट्यपूर्ण अशी एक उतरंडच तयार केली होती. समाजात प्रत्येक जातीला ~~स्थान~~ सामाजिक स्थान होते.

④ अस्पृश्यता -

हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेची परिणती जातिव्यवस्थेत झाली आहे. जातिव्यवस्थेच्या या विषवृक्षाला 'अस्पृश्यता' हे लागलेले महाविषारी फळ होय. हिंदू समाजरचनेने व या देशातील ग्रामीण जीवनात असणाऱ्या 'बलुतेदारी' पद्धतीने जातीयतेचे व अस्पृश्यतेचे पोषण करून त्यांना वृद्धिंगत करण्याचे, स्थिर करण्याचे काम केले आहे. १७०व्या शतकात धर्मशास्त्रांचा, स्मृतिकारांचा, पुराणांचा प्रभाव हिंदू समाज ~~व्यवहार~~ समाजरचनेवर होता. त्यांनी हिंदू समाज व समाजाचे व्यवहार जखडून, बांधून टाकले होते. या धर्मग्रंथांनीच शूद्र, अतिशूद्र, चांडाळ, दास अशा कनिष्ठ व सामाजिकदृष्ट्या हीन दर्जाच्या जातींचा जन्म झालेला आहे. ते या समाजाच्या खालच्या पायरीचे म्हणून अस्पृश्य मानले. 'अस्पृश्य' म्हणून त्यांना गावकुसाबाहेर कायमच्या वस्ती करून ठेवले. त्यांना खालच्या दर्जाची कामे दिली. ही कामे करण्यात त्यांनी काही कसूर केली तर त्याला कडक, कठोर शिक्षेची तरतूदसुद्धा करून ठेवली. उत्तर पेशवेकाळात महार, मांग, ढोर व चांभार यांना अस्पृश्य म्हणून वागविले जात होते.

⑤ वेठबिगार -

उत्तर पेशवाईत वेठबिगार पद्धत अस्तित्वात होती. अतिशूद्र जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून वापरले जाई. वेठबिगारांना सरकारी बांधकाम, रस्ते दुरुस्ती करणे,

सरकारीत गावल, कुरणे, कापडे, इनामदार, जहागिरदार देशमुख इ. महत्वाच्या वतनदारांच्या घरी वेठबिगार असत. त्यांच्याकडून सर्व प्रकारची कामे करून घेतली जात. छत्रपती, पेशवे, सरदार जेव्हा प्रवास, शिकार व तीर्थक्षेत्रास जात तेव्हा त्यांच्या प्रवासाची, राहण्याची, साहित्याची, जेवणखान व पाण्याची सोय करण्यासाठी कुंभार, सुतार, गुरव व लोहार इ. जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून राबावे लागत असे.

⑥ दास - दासी–

पेशवाई काळात महाराष्ट्रात दास- दासीची पद्धत अस्तित्वात होती. दास- दासींना साधारणता गुलामप्रमाणे वागविले जात असे. दासांना 'पोरगे' म्हणत तर दासींना 'कुणबीण' म्हणत घरगुती कामासाठी दास व दासी ठेवत असत. सरदार, जहागीरदार, राजे व त्यांच्या दरबार यांच्या घरी हे दास व दासी असत. पेशवेकाळात दासाची (पोरग्याची) किंमत 125–150 होती, तर दासीची (कुणबिणीची) किंमत 60–70 रु. होती. दास-दासींना मोबदला देऊन, पर्यायी व्यक्ती देऊन मुक्तता करून घेता येत असे. दास-दासी म्हातारे झाल्यानंतर मालक त्यांची दास्यातून मुक्तता करीत असत.

⑦ स्त्रीजीवन–

19 व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रातील समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान होती. मालमत्तेच्या अधिकार फक्त पुरुषालाच होता. कुटुंबात पुरुषांचीच सत्ता चालत असे. मात्र या काळात स्त्रियांची स्थिती मात्र अत्यंत वाईट व करुणाजनक होती. स्त्री जीवन हे धर्मशास्त्रे, रुढी, परंपरा चालीरीती यांच्या बंधनात सर्व बाजूंनी जखडले केले होते बंदिस्त झाले होते. चूल व मूल हीच की तिची मूलभूत कर्तव्ये ठरविली होती. भोगवस्तू म्हणून तिच्याकडे पाहिले जात होते. तिला आचार व विचारांचे स्वातंत्र्य नव्हते. शिक्षणाचा अधिकार नव्हता. धर्मग्रंथ व शास्त्रे पाचण्याचा

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class: B.A. II    Div. -    Roll No. 4632

Suppliment No. ______    Subject: HSRM

Name- Test / Tutorial No.: Pallavi Yashwant Kamble

अधिकार नव्हता. तिला वेदोक्त पद्धतीने कोणताही संस्कार करून घेण्यास मुभा नव्हती. संस्कारविधीत तिला शूद्राप्रमाणे वागविले जात असे होते. स्त्रियांविषयीच्या या काळात वाईट चालीरीती, रूढी, परंपरा यांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे -

अ) सती पद्धती-

सती पद्धती म्हणजे स्त्रीजीवनाला मोठा शाप होता. पेशवेकाळात या पद्धतीला प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. सती जाणाऱ्या विधवा स्त्रीयांची स्थिती करुण व केविलवाणी होत असे. सतीची चाल म्हणजे माणुसकीला काळिमा फासणारी पद्धत होती. पेशवेकाळात सतीच्या प्रथेस प्रोत्साहन मिळाले. 10-12 वर्षांच्या मुलीलासुद्धा सती जावे लागे. काही वेळा सती जाण्यासाठी जबरदस्ती केली जात असे. देशस्थापेक्षा कोकणस्थ ब्राह्मण सतीच्या चालीला अधिक काळ चिकटून राहिले.

ब) बालविवाह-

पेशवाईत सर्रास बालविवाह होत असत. मुलगी 8 ते 9 वर्षांच्या पुढे लग्नाशिवाय राहिल्यास पेशवाईत अधर्म मानला जात असे. मुलाचे लग्नाचे वय 12-13 वर्षांचे असे. पण पुरुष युद्धात आणीच्या रोगात मृत्यू पावल्यास त्या मुलीस सर्व आयुष्य विधवा अवस्थेत घालवावे लागे.

क) विधवा विवाहास बंदी-

ब्राह्मण समाज व ९६ कुळी क्षत्रिय मराठा यांच्यात विधवांच्या विवाहास बंदी होती. शुद्र व अतिशुद्र समाजात विधवांच्या विवाहाला परवानगी होती.

ड) केशवपन-

ब्राह्मण समाजात विधवा स्त्रीचे केशवपन व मुंडन करण्याची प्रथा सुरू होती. केशवपन केल्याने ती विद्रूप दिसावी हा हेतू होता. या विधवेस परावलंबी व अपमानीत जीणे आयुष्यभर जगावे लागत असे.

इ) बहुपत्नीकत्व-

१९ व्या शतकाच्या प्रारंभी बहुपत्नीकत्वाची चाल मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. सरदार, जहागीरदार वतनदारांच्यात ही प्रथा सर्रास सुरु होती. त्यामुळे पुरुष कोणत्याही वयात कितीही लग्ने करीत असत. विवाहबाह्य संबंध ठेवण्यास पुरुषांना परवानगी होती. अंगवस्त्र ठेवण्यास मान्यता होती.

याशिवाय या काळात स्त्रीजीवनाशी निगडीत देवदासींची पद्धत रूढ होती. तसेच बाला-जरठ विवाहसुद्धा काही प्रमाणात होत असल्याची अनेक उदाहरणे उत्तर पेशवाईत मिळतात. याशिवाय नरबळी, बालिका हत्या इत्यादीसारख्या अनेक अनिष्ट प्रथा रूढ होत्या. महाराष्ट्रात इंग्रजांची राजवट सुरु झाली तेव्हा येथील समाज व आधुनिक वैज्ञानिक व बुद्धिप्रामाण्यवादी विचारांपासून शेकडो योजने दूर होता. मुलभूत स्वातंत्र्य, सामाजिक समता, बंधुभाव, पुरोगामी विचार या बाबी स्वीकारण्यास या समाजाची तयार नव्हती. म्हणूनच १९ व्या शतकातील हा समाज गतिहीन होऊन बसला होता.

10/10

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class: B.A. II Sem. III  Div: Unit test  Roll No. 5040

Suppliment No.  Subject: HSRM

Test / Tutorial No. कृष्णा चंद्रकांत देवकुळे  दिनांक – 5-8-2019

प्र.१ १८ व्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती?

उत्तर:- १८ व्या शतकातील काळात महाराष्ट्रातील समाजात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्थेतील कडक निर्बंधांना विशेष महत्व प्राप्त झाले होते. वैज्ञानिक दृष्टिकोन व बुद्धिप्रामाण्यवाद यापेक्षा समाजजीवनातील कडक चालीरिती, रूढी, परंपरा व ग्रंथप्रामाण्याला विशेष महत्व होते. धार्मिक आचार व विचारांचा प्रभाव समाजजीवनावर पडला होता. भारतीय समाजाचे एकक वैशिष्ट्य म्हणजे 'एका गावात दोन गाव' हे होय. महाराष्ट्र त्याला अपवाद नव्हता. एक वेशीच्या ~~आतील गाव आणि दुसरे वेशीबाहेरील~~ गाव हिंदू धर्म व धर्ममार्तंडांनी बनविलेल्या या वर्ण व जातीव्यवस्थेमुळे येथे गावेच दुभंगलेली आहेत असे नाही, तर माणसांची मनेसुद्धा दुभंगलेली आहेत. अस्पृश्यांचे पाणवठे वेगळे, स्मशानवटे वेगळे आहेत. अस्पृश्यांना त्यांनी हिंदू मानले पण बांधव कधीच मानले नाही. सामाजिक विषमता हे या काळातील हिंदू समाजरचनेचे खास वैशिष्ट्य बनले होते.

१. धार्मिक जीवन :-

या काळातील समाजजीवनावर धार्मिक आचार व विचारांचा मोठा प्रभाव होता. परंतु पेशवेकाळात धर्माची मूलभूत तत्वे बाजूला पडली होती. धार्मिक आचार, परंपरा, कर्मकांड व व्रतवैकल्ये यांना महत्व प्राप्त होते. हिंदू धर्माचे शुद्ध स्वरूप नष्ट झाले होते. ब्राह्मणभोजने, दानधर्म, कर्मकांड यांचे महत्व वाढले होते. समाजात ऐतखाऊ व आळशी पुरोहितांचा वर्ग निर्माण झाला होता. उत्तर पेशवाई कालखंडात तर याचा कळस झाला. ज्योतिष, मुहूर्त, शुभाशुभ होते, नाम, जप, दान इत्यादींचे स्तोम माजले. व्रतवैकल्ये, नामजप अनुष्ठाने केल्याने पापक्षालन होते.

या काळातील लोकांचा, अनुष्ठानावर दृढविश्वास होता. त्यामुळे लोक अनेक प्रकारची अनुष्ठाने करत. अनुष्ठानावर भरमसाट खर्च केला जात असे. समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांडे, व्रतवैकल्ये यांचा पुरोहितांनी आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेतला. अशाप्रकारे अनेक अनिष्ट रुढी, परंपरा, अंधश्रद्धा आयोग्य आचार व विचार यांनी महाराष्ट्रातील धार्मिक जीवन व्याकोळलेले होते.

2. <u>अंधश्रद्धा व व्रतवैकल्ये</u> :-

पेशवेकाळात व्रतवैकल्यांना, भोळसट समजुती व अंधश्रद्धेत ऊत आला होता. दाने, व्रते, अनुष्ठाने उपवास केल्याने परमेश्वराची व ग्रहांची कृपा होते ही समजुत दृढ झाली होती. मंतत्राने संकटे दुर होतात. अरिष्ट टळते अशी समजुत होती. पायगुण, शकुन, अपशकुन यावर लोकांचा विश्वास होता. या काळातील समाज ग्रहणाला मोठे अरिष्ट मानत होता. ग्रहणामुळे आपल्यावर ग्रहांचा कोप होऊ नये म्हणून ग्रहण काळात लोक कुवतीप्रमाणे स्नान, दान व जप करत असत. मंत्रतंत्र, भुतबाधा, चेटुक, जारण-मारण-तारण, जादुटोणा यावर उजनी लोकांचा विश्वास होता. या संदर्भात वा. कृ. भावे म्हणतात. 'कोकणची भुते देशावरच्या भुतांपेक्षा जास्ती खटपटक होती.' अशा प्रकारच्या अंधश्रद्धा या काळात दिसतात.

3. <u>जातिव्यवस्था</u> :-

१८ व्या शतकाच्या प्रारंभी जातिव्यवस्थेचा जातिसंस्थेचा समाजात मोठा प्रभाव होता. जातिव्यवस्था ही एक या समाजातील भयंकर भयंकर पद्धती आहे. भारतात या जातिव्यवस्थेत हजारो जाति आहेत. त्याशिवाय शुध्द-अशुध्द, अस्पृश्य, आदिवासी, भटके, विमुक्त समाज असा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अधोगतीला गेलेले समाज या जातिव्यवस्थेच्या पोटी जन्माला आले आहेत. जातिव्यवस्थेमुळे मनुष्य ज्या जातीत आला तरी त्याची जात ठरते. जातीबरोबरच त्याचा धंदा ठरतो. मनुष्याची किंमत गुणावरून न ठरता ती त्याच्या जन्म घेतलेल्या जातीवर ठरते. एका जातीच्या माणसाला त्याच्या

जातीची कोंडी फोडून दुसऱ्या जातीत जाता येत नसे. तो ज्या जातीत जन्माला येतो त्याच जातीत आयुष्यभर जगून त्या जातीतच मरतो. समाजात प्रत्येक जातीला सामाजिक स्थान आहे. या स्थानानुसार प्रत्येक जातीला सामाजिक हक्क, अधिकार व कर्तव्ये लाभली होती. ~~उच्च व~~ वरील जातींना अनेक प्रकारचे विशेषाधिकार मिळाले होते तर कनिष्ठ, नीच जातीच्या लोकांना मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित ठेवले होते. अशा प्रकारची १९ व्या शतकातील प्रारंभी असल्याचे दिसते.

४. वेठबिगार :-

उत्तर पेशवाईत वेठबिगार पद्धत अस्तित्वात होती. अतिशूद्र जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून वापरले जाई. वेठबिगारांना सरकारी बांधकाम, रस्ते दुरुस्ती करणे, सरकारी गवत कुरणे कापणे, इनामदार, जहागीरदार, देशमुख इत्यादी महत्त्वाच्या वतनदारांच्या घरी वेठबिगार असत. त्यांच्याकडून ~~सर्व प्रकारची कामे करून घेतली जात. छत्रपती, पेशवे~~, सरदार, जेव्हा प्रवास, शिकार व तीर्थक्षेत्रास जात तेव्हा त्यांच्या प्रवासाची, राहण्याची, साहित्याची, जेवणखान व पाण्याची सोय करण्यासाठी कुंभार, सुतार, गुरव व लोहार इत्यादी जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून राबवले जात असत.

५. दास - दासी

पेशवाई काळात महाराष्ट्र दास-दासीची पद्धत अस्तित्वात होती. दास-दासींना साधारणतः गुलामाप्रमाणे वागविले जात. दासांना 'पोरगे' म्हणत तर दासींना 'कुणबीण' म्हणत. घरगुती कामासाठी दास-दासींना ठेवत असत. पेशवेकाळात दासांची (पोरग्याची) किंमत १२५-१५० होती तर दासींची (कुणबिणीची) किंमत ६०-७० रु. होती. दास-दासींना मोबदला देऊन, पर्यायी व्यक्ती देऊन मुक्तता करून घेता येत असे. दास-दासी म्हातारे झाल्यानंतर मालक त्यांची दास्यातून मुक्तता करीत असत.

६. स्त्रीजीवन :-

१९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रातील समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान होती. मालमत्तेचा अधिकार फक्त

पुरुषालाच होता. मात्र या काळात स्त्रियांची स्थिती मात्र अत्यंत वाईट व करुणाजनक होती. स्त्री जीवन हे धर्मशास्त्रे, रुढी, परंपरा, चालीरिती यांच्या बंधनात सर्व बाजुनी जखडले गेले होते. बंदिस्त झाले होते. चुल व मुल हीच तिची मुलभूत कर्तव्ये ठरविली होती. या काळातील स्त्री यांविषयीच्या वाईट चालीरिती, रुढी, परंपरा थोडक्यात पुढीलप्रमाणे :-

अ) सतीपध्दती :

सतीपध्दती म्हणजे स्त्रीजीवनाला मोठा शाप होता. पेशवेकाळात या पध्दतीला प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. सतीची चाल म्हणजे माणुसकीला काळिमा फासणारी पध्दत होती. पेशवेकाळात सतीच्या प्रथेस प्रोत्साहन मिळाले. १०-१२ वर्षाच्या मुलींनासुध्दा सती जावे लागे. काही वेळा सती जाण्यास जबरदस्ती केली जात.

ब) बालविवाह :- पेशवाईत सर्रास बालविवाह होत असत. मुलगी ७ ते ८ वर्षाच्या पुढे लग्नाशिवाय राहिल्यास पेशवाईत अधर्म मानला जात असे. मुलांच्या लग्नाचे वय १२-१५ वर्षाचे असे पण पुरुष वृध्दही, साथीच्या रोगात मृत्यू पावल्यास त्या मुलीस सर्व आयुष्य विधवा अवस्थेतच घालवावे लागे.

क) विधवा विवाहास बंदी :- ब्राम्हणसमाज व ९६ कुळी क्षत्रिय मराठा यांच्यात विधवांच्या विवाहास बंदी होती. शुद्र व अतिशुद्र समाजात विधवांच्या विवाहाला परवानगी होती.

ड) केशवपन :- ब्राम्हण समाजात विधवा स्त्रीचे केशवपन व मुंडन करण्याची प्रथा सुरु केशवपन केल्याने ती विद्रुप दिसावी हा हेतू होता. या विधवेस परावलंबी व अपमानीत जीणे आयुष्यभर जगावे लागत असे.

इ) बहुपत्नीकत्व :- १९ व्या शतकाच्या प्रारंभी बहुपत्नीकत्वाची चाल मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. सरदार, जहागीरदार, वतनदारांच्यात ही प्रथ सर्रास सुरु होती. त्यामुळे पुरुष कोणत्याही वयात कितीही लग्ने करीत असत. विवाहबाह्य संबंध ठेवण्यास पुरुषांना परवानगी होती. अंगवस्त्रे ठेवण्यासही मान्यता होती.

9/10

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class B.A. II Div Unit test Roll No. 5138

Suppliment No. ______ Subject H.S.R.M.

Test / Tutorial No. kamble Swapnil Rajaram दिनांक - 5-8-2014

प्रश्न १९ व्या शतकाच्या प्रारंभीची महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती स्पष्ट करा ?

→ प्रस्तावना :-

इ. स. 1713 मध्ये जन्माला आलेली पेशवाई 1818 मध्ये संपुष्टात आली. इंग्रजांनी शनिवार वाड्यावर 'युनियन जॅक' फडकवला आणि इंग्रजांचे महाराष्ट्रात राज्य सुरु झाले. महाराष्ट्रात आजपर्यंत कितीतरी राजकीय संघर्ष झाले. त्यातून कितीतरी राजकीय स्थित्यंतर घडून आली पण सामाजीक दृष्टीकोनातून विचार केला तर त्यात कोणताच बदल झालेला दिसत नव्हता. वैज्ञानिक दृष्टीकोन व बुध्दिप्रामाण्यवाद यापेक्षा समाज जीवनातील चालीरीती, रूढी - परंपरा व ग्रंथप्रामाण्याला विशेष महत्व होते. धार्मिक आचार व विचारांचा प्रभाव समाजजीवनावर पडला होता. भारतीय समाजाचे ठळक वैशिष्ट्ये म्हणजे 'एका गावात दोन गावे.' महाराष्ट्र याला अपवाद नव्हता. एक वेशीच्या आत गाव तर दुसरं वेशीबाहेरील. हिंदू धर्म व धर्ममार्तंडांनी बनवलेल्या या वर्ण जातिव्यवस्थेमुळे येथे गावेच व माणसांची मने सुध्दा दुभंगलेली आहेत. अस्पृश्यांचे पाणवठे वेगळे व मसनवटे वेगळी आहेत. सामाजिक विषमता हे या काळातील हिंदू समाजरचनेचे खास वैशिष्ट्ये बनले होते.

1] धार्मिक जीवन :-

या काळातील समाजजीवनावर धार्मिक आचार व विचारांचा मोठा प्रभाव होता. परंतु पेशवेकाळात धर्माची मुलभूत तत्वे बाजूला पडली होती.

(12)

धार्मिक आचार-विचार, परंपरा, कर्मकांड व व्रतवैकल्ये यांना महत्त्व प्राप्त झाले होते. हिंदू धर्माचे शुद्ध स्वरूप नष्ट झाले होते. ब्राह्मण भोजने, दानधर्म, कर्मकांड यांचे महत्व वाढले होते. समाजात पेतखाऊ व आळशी पुरोहितांचा वर्ग निर्माण झाला होता. ज्योतिष, मुहूर्त, शुभ अशुभ व्रते नाम, जप, दान इ. स्तोम माजले. व्रतवैकल्य, नामजप केल्याने पापक्षालन होते. देवदेवतांची कृपा होते असा विचार रूढ झाला. धर्मगुरू, शास्त्री, पंडित या उच्चवर्णियांनासुद्धा खऱ्या धर्माचा व धर्मतत्त्वाचा विसर पडला होता. धर्माच्या नावाखाली सर्वत्र अधर्म माजला होता. तंत्र-मंत्राने, जादुटोणा भुतपिशाच्च, विद्या यांना या काळात विशेष महत्व प्राप्त झाले होते. समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांडे, व्रतवैकल्ये यांचा पुरोहितांनी आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेतला. पेशवाईत मोठ्या प्रमाणात ब्राह्मणांना दानधर्म करणे, त्यांना सहस्त्र लक्ष भोजने घालणे यामुळे पुण्य लाभते अशी समाजाची श्रद्धा होती. दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळात तर ब्राह्मण भोजन व त्यांना दक्षिणा यावर लाखो रुपयांची उधळपट्टी करण्यात आली होती.

२) कुटूंबपद्धती :-

भारतीय समाजाचे व्यक्ती, वर्ण, कुटूंब व जाती असे चार घटक आहेत. कुटूंबव्यवस्था ही भारतीय समाजाची एक महत्वाची संस्था आहे. अगदी प्राचीन काळाप्रमाणेच १९व्या शतकातही संयुक्त कुटूंब-पद्धती अस्तित्वात होती. त्यामध्ये एक-दोन पिढ्यांची माणसे एकत्र राहत होती. कुटूंबात एक कारभारी पुरुष असे कुटूंब चालविण्याची जबाबदारी असे कुटूंबातील इतर सदस्य त्याच्या आदेशाने पालन करीत.

३) जातिव्यवस्था :-

भारतीय हिंदू समाजव्यवस्थेमध्ये संस्था हा एक महत्त्वाचा घटक असून ती प्राचीन सामाजिक

संस्था आहे. जातिव्यवस्था ही एक या समाजातील भयंकर पध्दती आहे. भारतात या जाती संस्थेत हजारो जाती आहेत त्याशिवाय शुद्र, अतिशुद्र, अस्पृश्य, आदिवासी, भटके समाज असा सामाजिक व आर्थिक दृष्ट्या अधोगतीला गेलेले समाज या जातिव्यवस्थेच्या पोटी जन्माला आलेले आहेत. जातीव्यवस्थेमुळे मनुष्य ज्या जातीत जन्माला आला ती त्याची जात ठरते. जाती बरोबर त्याचा धंदा ठरतो. मनुष्याची किंमत गुणावरून न ठरवता त्याच्या जन्म घेतलेल्या जातीवर ठरते.

4) अस्पृश्यता :-

जातिव्यवस्थेच्या या विष वृक्षाला 'अस्पृश्यता' हे लागलेले महाविषारी फळ होय. सामाजिक दृष्ट्या दोन दर्जाच्या जातींचा जन्म झाला. शुद्र, अतिशुद्र, चांडाळ इ. समाजाच्या लोकांना खालच्या पायरीचे म्हणून अस्पृश्य मानले. अस्पृश्य म्हणून त्यांना गावकुसाबाहेर कायमचे वस्ती करून ठेवले. मंदिरात प्रवेश नव्हता. इ. प्रकारे 19 व्या शतकात प्रारंभी अस्पृश्यांची स्थिती ही दयनीय, दुर्दैवी व अत्यंत हालाखीची व वाईट परिस्थिती होती.

5) वेठबिगार :-

उत्तर पेशवाईत वेठबिगार पध्दत अस्तित्वात होती. अतिशुद्र जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून वापरले जाई. वेठबिगारांना सरकारी बांधकाम, रस्ते दुरुस्ती, गवत, कुरणे कापणे, इनामदार, जहागीरदार, देशमुखी, इ. महत्वाच्या वतनदारांच्या घरी वेठबिगार असत. छत्रपती, पेशवे, सरदार जेव्हा प्रभाव, शिकार व तीर्थक्षेत्राला जात तेव्हा त्यांच्या प्रवासाची, राहण्याची, आतिथ्याची, व जेवणखाण व पाण्याची सोय करण्याची कुंभार, सुतार, गुरव व लोहार इ. जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून राबावे लागत असे.

6) दास-दासी :-

पेशवाई काळात महाराष्ट्रात दास-दासींची पध्दत अस्तित्वात होती. दासांना 'पोरगे' म्हणत तर दासींना 'कुणबीण' म्हणत. घरगुती कामासाठी दास-दासींचा

सरदार, जहागीरदार, राजे व त्यांच्या दरबारी यांच्या पदरी हे दास दासी असत. दास-दासी म्हातारे झाल्यावर मालक त्यांची दास्यातू न मुक्तता करत.

7) स्त्रि जीवन :-

19 व्या शतकात प्रारंभीची समाजव्यवस्था ही मुख्य पुरूष प्रधान होती. मालमत्तेच्या अधिकार फक्त पुरूषांना होता. पुरूषांची सत्ता होती. स्त्री जीवन हे धर्मशास्त्र, रूढी-परंपरा, चालीरीती यांच्या बंधनात जखडले होते. चूल व मूल हीच तिची मूलभूत कर्तव्य ठरली.

(अ) सती पद्धती :-

सती जाणाऱ्या विधवा स्त्रियांची स्थिती करूण व केविलवाणी होत असे. 10-12 वर्षाच्या मुली सुध्दा सती जात होते. देशपिंड्या कोकणस्थ ब्राह्मण यतींच्या चालीला बरीच वेळी

(ब) बालविवाह :-

पेशवाईत सर्रास बालविवाह होत असत. मुली 8 ते 9 वर्षाच्या पुढे लग्नाशिवाय राहिल्यास पेशवाईत अधर्म मानला जात. मुलांचे लग्नाचे वय 12-13 वर्ष मानले जाई. पुरूष युध्दात साथीच्या रोगात मृत्यू पडला तर त्या मुलीला आयुष्यभर विधवा अवस्थेत घालवावे लागे.

(क) विधवा विवाहास बंदी :-

ब्राह्मण समाज व 96 कुळी क्षत्रिय मराठे यांच्यात विधवांच्या विवाहास बंदी होती. शुद्र व अतिशुद्र समाजात विधवांच्या विवाहास परवानगी होती.

(ड) केशवपन :-

ब्राह्मण समाजात विधवा स्त्रिचे केशवपन व मुंडन करण्याची प्रथा सुरू होती. हे केल्याने ती विद्रूप दिसावी हा हेतू होता. या विधवेस परावलंबी व अपमानीत जीणे आयुष्यभर जगावे लागत असे.

(इ) बहुपत्नीकत्व :-

या काळी पुरूष कोणत्याही वयात कितीही लग्न करित असत. विवाहबाह्य संबंध ठेवण्यास पुरूषांना होती.

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class B.A.-II Div. Unit test Roll No. 5034 / 4577

Suppliment No. ________ Subject HSM1

Test/Tutorial No. Snehal Rajendra Birade Date: 5/8/2019

प्र-1 19 व्या शतकाच्या प्रारंभीची महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती स्पष्ट करा.

→ प्रस्तावना :-

महाराष्ट्राच्या नव्हेच संपूर्ण भारताच्या इतिहासात 19 वे शतक हे महत्त्वाचे व वैशिष्ट्यपूर्ण असे शतक होते. या शतकाच्या प्रारंभीस भारतात इंग्रजी सत्ता स्थिर झाली. इंग्रजांनी महाराष्ट्रातील पेशवाईबरोबर मराठी सत्तासुद्धा संपविली. महाराष्ट्रात घडून आलेल्या या राजकीय परिवर्तनाचे दूरगामी परिणाम येथील समाजाच्या व समाजजीवनाच्या सर्वच अंगावर झाले. महाराष्ट्रात नव्या युगाची सुरुवात झाली. 19 व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील समाजाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनात नवे युग उदयास आले.

या काळात महाराष्ट्रातील समाजात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्थेतील कडक निर्बंधांना विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. वैज्ञानिक दृष्टिकोन व बुद्धिप्रामाण्यवाद यांपेक्षा समाजजीवनातील चालीरीती, रूढी, परंपरा व ग्रंथप्रामाण्याला विशेष महत्त्व होते. धार्मिक आचार व विचारांचा प्रभाव समाजजीवनावर पडला होता. हिंदू धर्म व धर्ममार्तंडांनी बनविलेल्या या वर्ण व जातिव्यवस्थेमुळे येथे माणसेच दुभंगलेली आहेत असे नाही तर माणसांची मनेसुद्धा दुभंगलेली आहेत. अस्पृश्यांचे पाणवठे वेगळे, स्मशाने वेगळे आहेत. अशा प्रकारे येथील समाज जाती-धर्म व्यवस्थेने वेष्टित केला होता. अस्पृश्यांना त्यांनी हिंदू मानले पण बांधव कधीच मानले नाही. सामाजिक विषमता हे या काळातील हिंदू समाजरचनेचे प्रमुख वैशिष्ट्य बनले होते.

1) धार्मिक जीवन :- या काळातील समाजजीवनावर धार्मिक आचार व विचारांचा मोठा प्रभाव होता. परंतु पेशवेकाळात धर्माची मूलभूत तत्त्वे बाजूला पडली होती धार्मिक, आचार, परंपरा, कर्मकांड व व्रतवैकल्ये यांना महत्त्व प्राप्त झाले होते हिंदू धर्माचे शुद्ध स्वरूप नष्ट झाले होते ब्राह्मण भोजने, दानधर्म, कर्मकांड यांचे महत्त्व वाढले होते. समाजात भिक्षुक व भटजी पुरोहितांना

वर्ग निर्माण झाला होता. उत्तर पेशवाई कालखंडात तर याचा कळस झाला. ज्योतिष, मुहूर्त, शुभाशुभ व्रते, नाम, जप, दान इत्यादीचे स्तोम माजले. व्रतवैकल्ये, नामजप, अनुष्ठाने केल्याने पापक्षालन होते देवदेवतांची कृपा होते असा विचार रूढ झाला. धर्मगुरू, शास्त्री, पंडित या उच्च वर्णीयांनाच खऱ्या धर्माचा व धर्मतत्त्वांचा विसर पडला होता. धर्माच्या नावाखाली सर्वत्र अ माजला होता. तंत्र-मंत्र, जादूटोणा, भूतपिशाच्च विद्या यांना या काळात विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. या काळातील लोकांचा अनुष्ठानावर दृढ वि होता. त्यामुळे लोक अनेक प्रकारची अनुष्ठाने करत. अनुष्ठानावर भरमसाट केला जात असे. प्रसिद्ध समाजसुधारक लोकहितवादी यांनी १९व्या शतक प्रारंभी दिसणाऱ्या समाजाच्या धार्मिक स्थितीविषयी म्हटले आहे,

"हिंदू लोकांत सांप्रत अनाचार फार माजला आहे. निरर्थक कामे आणि ढों फार होऊन त्यातील बीजरूपी जी नीती तीच भ्रष्ट झाली आहे. आता जो धर्म चालला आहे तो धर्म नव्हे, हा बेबंद गोंधळ आहे. लोकनीती नाहीशी झाली व धर्म बुडाला असे म्हणतात पण मला तर धर्म कोठेच दि नाही." थोडक्यात, १९ व्या शतकाच्या प्रारंभी धार्मिक जीवनाचे स्वरूप पाहिल्यास या काळात वेदपरंपरा नष्ट झाली होती. बुद्धिप्रामाण्याऐ अंधश्रद्धा, रूढी व परंपरा यांनाच जास्त महत्त्व आल्याने खरा धर्म मागे पडला होता. या काळात हिंदू धर्मात अनेक पंथ-उपपंथांचा उदय झाला होता. प्रत्येक जण स्वतःच्या श्रद्धेनुसार वेगवेगळ्या पंथांचा उपासक होता. उत्तर पेशवाईत शाक्तपंथासारख्या काही अघोरी पंथांनासुद्धा समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. अशा प्रकारे अनेक अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अयोग्य आचार व विचार यांनी महाराष्ट्रातील धार्मिक जीवन झाकोळलेले होते.

2) अंधश्रद्धा व व्रतवैकल्ये :-

पेशवेकाळात व्रतवैकल्यांना, भोळसट समजुती व अंधश्रद्धेस ऊत आला होता. दाने, व्रते, अनुष्ठाने, उपवास केल्याने परमेश्वराची व ग्रहांची कृपा होते ही समजूत दृढ झाली होती. मंत्रतंत्राने संकटे दूर होतात अरिष्ट टळते अशी समजूत होती. व्रतांची नावे ती करण्याची पद्धत व त्यांची फळे यासंबंधीचे व्यापक उल्लेख मराठी कागदपत्रात मिळतात. पायगुण, शकुन, अपशकुन यावर लोकांचा विश्वास होता. या काळातील समाज ग्रहणाला मोठे अरिष्ट मानत होता. ग्रहणामुळे आपल्यावर ग्रहांचा कोप होऊ नये म्हणून ग्रहण काळात लोक कुवतीप्रमाणे स्नान, दान व जप करत असत.

मंत्रतंत्र, भूतबाधा, चेटूक, जारण-मारण-तारण, जादूटोणा यावर अज्ञानी लोकांचा विश्वास होता. भुताटकी, चेटूक, देव-देवऋषी हे तर त्या काळातील समाजाच्या पाचवीलाच पुजले होते. या संदर्भात वा.कृ. भावे म्हणतात, 'कोकणची भुते देशावरच्या भुतांपेक्षा जास्ती खट्याळ होती.' अशा प्रकारच्या अंधश्रध्दा त्या काळात दिसतात.

३) जातिव्यवस्था :- १९ व्या शतकाच्या प्रारंभी जातिव्यवस्थेचा, जातिसंस्थेचा समाजात मोठा प्रभाव होता. जातिव्यवस्था ही एक या समाजातील भयंकर पध्दती आहे. माणसाच्या जीवनावर सर्व प्रकारचा प्रभाव पाडून त्याचे नियंत्रण ही करते. भारतात या जातिव्यवस्थेत हजारो जाती आहेत. त्याशिवाय शूद्र-अतिशूद्र, अस्पृश्य, आदिवासी, भटके-विमुक्त समाज अशा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अधोगतीला गेलेले समाज या जातिव्यवस्थेच्या पोटी जन्माला आले आहेत. या जातिव्यवस्थेला धर्मशास्त्रांचा, स्मृती व पुराणांचा आधार होता. त्यामुळेच जातिव्यवस्थेने माणसाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावर पोलादी पकड ठेवून कडक नियंत्रण ठेवले होते. जातिव्यवस्थेमुळे मनुष्य ज्या जातीत जन्माला आला ती त्याची जात ठरते. जातीबरोबरच त्याचा धंदा ठरतो. मनुष्याची किंमत गुणावरून न ठरता ती त्याच्या जन्म घेतलेल्या जातीवर ठरते. जातिसंस्थेने वैशिष्ट्यपूर्ण अशी एक उतरंडच तयार केली होती. समाजात प्रत्येक जातीला सामाजिक स्थान होते. या स्थानानुसारच प्रत्येक जातीला सामाजिक हक्क, अधिकार, व कर्तव्ये लाभली होती. उच्च व वरील जातींना अनेक प्रकारचे विशेषाधिकार मिळाले होते. तर कनिष्ठ व नीच जातीच्या लोकांना मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित ठेवले होते. त्याच्यावर कडक व जाचक बंधने लादली होती. या बंधनांचे उल्लंघन केल्यास सामाजिक बहिष्कार, जातिबहिष्कृत करण्यात येत असे. रोटीबेटी व्यवहार, विवाह जातीच्या बाहेर जाऊन करता येत नसत. जातिबाह्य विवाह हा गंभीर स्वरूपाचा सामाजिक गुन्हा मानला जात असे. ब्राम्हण स्वतःला सर्व जातीच्या लोकांपेक्षा श्रेष्ठ, उच्च समजत. इतर सर्व जातीतील लोकांना तुच्छ कनिष्ठ लेखत. ब्राम्हणांची सेवा करणे हा शूद्रांचा धर्म व कर्तव्यच आहे असे प्रतिपादन केले जात असे. तसेच धर्माच्या नावावर कनिष्ठ, शूद्र व अतिशूद्र जातीच्या लोकांची शोषणाची एक कायमस्वरूपी टिकून राहणारी सामाजिक व्यवस्थाच निर्माण करून ठेवली होती. अशा प्रकारची जातिव्यवस्था महाराष्ट्रात १९ व्या शतकाच्या प्रारंभी असल्याचे दिसते.

२

४) अस्पृश्यता :- हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेची परिणती जातिव्यवस्थेत आ आहे. जातिव्यवस्थेच्या या विषवृक्षाला 'अस्पृश्यता' हे लागलेले महाविषारी फळ होय. हिंदू समाजरचनेने व या देशातील ग्रामीण जीवनात असणाऱ्या 'बलुतेदारी' पध्दतीने जातीयतेचे व अस्पृश्यतेचे पोषण करून त्यांना दृढ करण्याचे, स्थिर करण्याचे काम केले आहे. १७ व्या शतकात धर्मशास्त्रांचा, स्मृतिकारांचा, पुराणांचा प्रभाव हिंदू समाज व्यवहारावर, समाजरचनेवर होता त्यांनी हिंदू समाज व समाजाचे व्यवहार जखडून, बांधून टाकले होते. या धर्मग्रंथांनीच शुद्र, अतिशूद्र, चांडाळ, दास अशा कनिष्ठ व सामाजिक हीन दर्जाच्या जातीचा जन्म झालेला आहे. ते या समाजाच्या खालच्या पायरी म्हणून अस्पृश्य मानले. उत्तर पेशवेकाळात महार, मांग, ढोर व चांभार अस्पृश्य म्हणून वागविले जात होते या जातीतील लोकांचे जगणे अमानुष व मानवतेला कलंक फासणारे होते. अशा प्रकारे १७ व्या शतकाच्या प्रारंभी अस्पृश्यांची स्थिती ही दयनीय, दुर्दैवी, अत्यंत हलाखीची व वाईट होती.

५) वेठबिगार :- उत्तर पेशवाईत वेठबिगार पध्दत अस्तित्वात होती. अतिशूद्र जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून वापरले जाई. वेठबिगारांना सरकारी बांधकाम, रस्ते दुरुस्ती करणे, सरकारी गवत, कुरणे कापणे, इनामदार, जहागीरदार, देशमुख इ. महत्वाच्या वतनदारांच्या घरी वेठबिगार असत त्यांच्याकडून सर्व प्रकारची कामे करून घेतली जात. छत्रपती, पेशवे, सरदार जेव्हा प्रवास, शिकार व तीर्थप्रवास जात तेव्हा त्यांच्या प्रवासाची, राहण्याच साहित्याची, जेवणखान व पाण्याची सोय करण्यासाठी कुंभार, सुतार, सुरव लोहार इ. जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून राबावे लागत असे.

६) दास-दासी :- पेशवाई काळात महाराष्ट्रात दास-दासींची पध्दत अस्तित्व होती. दास-दासींना साधारणतः गुलामाप्रमाणे वागविले जात असे. दासांना 'पोरगे' म्हणत तर दासींना 'कुणबीण' म्हणत. घरगुती कामासा दास व दासी ठेवत असत सरदार, जहागीरदार, राजे व त्यांचा दरबार त्यांच्य पदरी हे दास व दासी असत. पेशवेकाळात दासाची (पोरग्याची) किंमत १२५-१५० होती, तर दासीची (कुणबिणीची) किंमत ६०-७० रू होती दास-दासी मोबदला देऊन, पर्यायी व्यक्ती देऊन मुक्तता करून घेता येत असे. दास-दासींना म्हातारे झाल्यानंतर मालक त्यांची दास्यातून मुक्तता करीत असत.

Snehal Rajendra Burdse B.A - II
Roll No - 4527

7) स्त्रीजीवन :- १९व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रातील समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान होती मालमत्तेचा अधिकार फक्त पुरुषालाच होता. कुटुंबात पुरुषाचीच सत्ता चालत असे. मात्र या काळात स्त्रियाची स्थिती मात्र अत्यंत वाईट व करुणाजनक होती स्त्रीजीवन हे धर्मशास्त्रे, रुढी, परंपरा चालीरीती यांच्या बंधनात सर्व बाजूंनी जखडले गेले होते. बंदिस्त झाले होते चूल व मूल हीच तिची मूलभूत कर्तव्ये ठरविली होती. भोगवस्तू म्हणून तिच्याकडे पाहिले जात असे. तिला आचार व विचारांचे स्वातंत्र्य नव्हते. शिक्षणाचा अधिकार नव्हता. धर्मग्रंथ व शास्त्रे वाचण्याचा अधिकार नव्हता तिला वेदोक्त पध्दतीने कोणताही संस्कार करुन घेण्यास मुभा नव्हती. संस्कारविहीत तिला शूद्रासारखे वागविले जात होते. स्त्रियांविषयीच्या या काळातील वाईट चालीरीती, रुढी, परंपरा यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे -

अ] सती पध्दती = सती पध्दती म्हणजे स्त्रीजीवनाला मोठा शाप होता. पेशवेकाळात या पध्दतीला प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. सती जाणाऱ्या विधवा स्त्रियांची स्थिती करुण व केविलवाणी होत असे. सतीची चाल म्हणजे माणुसकीला काळिमा फासणारी पध्दत होती. पेशवेकाळात सतीच्या प्रथेस प्रोत्साहन मिळाले. १०-१२ वर्षाच्या मुलीलासुद्धा सती जावे लागे. काही वेळा सती जाण्यासाठी जबरदस्ती केली जात असे.

ब] बालविवाह :- पेशवाईत सर्रास बालविवाह होत असत मुलगी ८ ते ९ वर्षाच्या पुढे लग्नाशिवाय राहिल्यास पेशवाईत अधर्म मानला जात असे मुलाचे लग्नाचे वय १२-१३ वर्षाचे असे. पण पुरुष युध्दात साथीच्या रोगात मृत्यू पावलास त्या मुलीस सर्व आयुष्य विधवा अवस्थेतच घालवावे लागे.

क] विधवा विवाहास बंदी :- ब्राम्हण समाज व ९६ कुळी क्षत्रिय मराठा यांच्यात विधवांच्या विवाहास बंदी होती शूद्र व अतिशूद्र समाजात विधवांच्या विवाहाला परवानगी होती.

ड) केशवपन !- ब्राम्हण समाजात विधवा स्त्रीचे केशवपन व मुंडन करण्याची प्रथा सुरु होती केशवपन केल्याने ती विद्रूप दिसावी, हा हेतू होता. या विधवेस परावलंबी व अपमानीत जीणे आयुष्यभर जगावे लागत असे.

ई) बहुपत्नीकत्व !- १९ व्या शतकाच्या प्रारंभी बहुपत्नीकत्वाची चाल मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती सरदार जहागीरदार वतनदारांच्या ही प्रथा सर्रास सुरु होती त्यामुळे पुरुष कोणत्याही वयात कितीही लग्ने करीत असत. विवाहबाह्य संबंध ठेवण्यास पुरुषांना परवानगी होती. अंगवस्त्र ठेवण्यासही मान्यता होती.

याशिवाय या काळात स्त्रीजीवनाशी निगडीत देवदासींची पद्धत रुढ होती. तसेच बालजरठ विवाह सुद्धा काही प्रमाणात होत असल्याची अनेक उदाहरणे उत्तर पेशवाईत मिळतात. याशिवाय नरबळी, बालिका हत्या इ. सारख्या अनेक अनिष्ट प्रथा रुढ होत्या. मूलभूत स्वातंत्र्य, सामाजिक समता, बंधुभाव, पुरोगामी विचार या बाबी स्वीकारण्यास या समाजाची तयारी नव्हती म्हणूनच १९ व्या शतकातील हा समाज गतिहीन होऊन बसला होता.

दास-दासींना म्हातारे झाल्यानंतर मालक त्यांची दास्यातून मुक्तता करीत असत.

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class B.A-II Div Unit test Roll No. 5187
Suppliment No. Subject HSRM
Test / Tutorial No.

9/10

शुभांगी वसंत भोपळे
Class - B.A - II
Roll No -

प्र१) १९ व्या शतकाच्या प्रारंभीची महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचे वर्णन करा.

१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणांच्या चळवळीचा इतिहास पाहण्यापूर्वी १९ व्या शतकाच्या प्रारंभ येथील समाजजीवनाचे स्वरूप काय होते. ते पाहणे आवश्यक ठरते. ते अभ्यासल्याशिवाय समाजसुधारणेच्या चळवळीच्या इतिहासाचे आकलन होत नाही. या काळात महाराष्ट्रातील समाजात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्थेतील कडक निर्बंधांना विशेष महत्व होते, परंपरा व ग्रंथप्रामाण्याला विशेष महत्व होते धार्मिक आचार व विचार प्रभाव समाजजीवनावर पडत होता भारतीय समाजाचे एक वैशिष्ट्ये म्हणजे 'एका गावात दोन गावे' हे होय. महाराष्ट्र त्याला अपवाद नव्हता एका वेशीच्या आतील गाव आणि दुसरे वेशी वैशिष्ट्यावरून सुद्धा होऊ शकते. हिंदु धर्म व धर्ममार्तंडांनी बनविलेल्या या वर्ण व जातिव्यवस्थेमुळे येथे गावेच दुभंगलेली आहे. भारतातील व महाराष्ट्रातील ग्रामीण समाजजीवनाचे आकलन केवळे या एका वैशिष्ट्यावरूसुद्धा होऊ शकते. हिंदु धर्म व धर्ममार्तंडांनी बनविलेल्या या वर्ण व जाति. अस्पृश्यांना त्यांनी हिंदू मानले पण बाह्य कधीच मानले नाही. सामाजिक विषमता हे या काळातील वैशिष्ट्ये राहीले आहे.

१) धार्मिक जीवन :- या काळातील समाजजीवनावर धार्मिक आचार व विचारांच्या मोठ्या प्रभाव होता परंतु पेशवेकाळात धर्माची मुलभूत तत्वे बाजूला पडली होती. धार्मिक आचार, परंपरा, कर्मकांड व व्रतवैकल्ये यांना महत्व प्राप्त झाले. होते. हिंदू धर्माचे शुद्ध स्वरूप राहीले नव्हते. ब्राह्मण भोजन, दानधर्म, कर्मकांड यांचे महत्व वाढले होते. समाजात ऐतखाऊ व आळशी पुरोहीतांचा वर्ग निर्माण झाला होता. उत्तर पेशवाई कालखंडात तर याचा कळस झाला. ज्योतिष, मुहूर्त, शुभाशुभ व्रते, नाम, जप, दान इत्यादींचे स्तोम माजले. व्रतवैकल्ये, नामजप अनुष्ठाने केल्याने पापक्षालन होते. देवदेवतांची कृपा होते. मंत्राने संकटे दूर होतात असे मानले जात होते. दानधर्माने पुण्य प्राप्त होते ही समाजाची धारणा होती. शुद्ध भावने याचा ब्राह्मणांवर अक्षरशः वर्षाव होत असे. दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळात तर ब्राह्मण भोजन व ब्राह्मणांना दक्षिणा यावर लाखो रूपयांचा उधळपट्टी करण्यात आली होती. १९ व्या शतकाच्या प्रारंभी धार्मिक जीवनाचे स्वरूप पाहिल्यास या शतकात वेदपरंपरा लोप पावली होती. असा प्रकारे अनेक अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अयोग्य आचार व विचार यांनी महाराष्ट्रातील धार्मिक जीवन साकोळलेले होती.

२) अंधश्रद्धा व वै व्रतवैकल्ये :-

पेशवेकाळात व्रतवैकल्यांना भोळसट समजुती व अंधविचाराचा अत आला होता. दान व्रते, अनुष्ठाने उपवास केल्याने परमेश्वराची व ग्रहांची कृपा होते ही समजूत दृढ झाली होती. मंत्रतंत्राने संकटे दूर होतात. अरिष्ट टळतात अशी समजूत होती. व्रतांची नावे ती करण्याची पद्धत व त्यांची फळे यासंबंधीची व्यापक उल्लेख मराठी काद कागद-पत्रांचा मिळतात. पायगुण, शकून, यावर लोकांचा विश्वास होता. या काळातील समाज ग्रहणाला मोठे अरिष्ट मानत.

काळात लोक कुवतीप्रमाणे स्नान, दान व जप करत असत मंत्रमंत्र तंत्र भूतबाधा, चेटूक, जारणमारण - तारण, जादूटोणा यावर अज्ञानी लोकांचा विश्वास होता भूताटकी, चेटूक, देव - देवस्की म्हणतात 'कोकण भुते देशावरच्या भुतांपेक्षा जास्ती अव्याढ होती' अशा प्रकारच्या अंधश्रद्धा त्या काळात दिसतात.

२) जातिव्यवस्था

19 व्या शतकाच्या प्रारंभी जातिव्यवस्थेचा, जातिसंस्थेचा समाजात मोठा प्रभाव होता. जातिव्यवस्था ही एक या समाजातील भयंकर पद्धती आहे. माणसाच्या जीवनावर सर्व प्रकारचा प्रभाव पाडून त्याचे नियंत्रण ही करते. भारतात या विमुक्त समाज अशा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अधोगतील गेलेले समाज या जातिव्यवस्थेच्या पोटी जन्माला आले आहेत. या जातिव्यवस्थेला धर्मशास्त्रांचा स्मृती व पुराणांचा आधार होता. त्यामुळेच जातिव्यवस्थेने माणसाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनावर पोलादी पकड ठेवून कडक नियंत्रण ठेवले होते. जातिव्यवस्थेमुळे मनुष्य ज्या जातीत जन्माला आला तर त्याची जात ठरते. जातीबरोबरच त्यांचा धंदा ठरतो मनुष्याची किंमत गुणावरून न ठरता ती त्या जात ठरते. जातीबरोबर त्याचा धंदा ठरतो पुन मनुष्याची किंमत गुणावरून न ठरता ती त्याच्या जन्म होतलेल्या जातीवर ठरते. एका जातीच्या माणसाला त्याला जातीची कोंडी फोडून दुसऱ्या जातीत जाता येत नाही. तो ज्या जातीत जन्माला येतो, त्याच जातीत आयुष्यभर जगून त्या जातीतच मरतो जातिसंस्थेने नैराश्यपूर्ण अशी एक उतरंडच तयार केली होती. अत्यंत बिकट परिस्थीती होती.

वेठबिगार :- उत्तर पेशवाईत वेठबिगार पद्धत अस्तित्वात होती अतिशूद्र जातीतील लोकांना वेठबिगार म्हणून वापरले जाई.

वेठबिगारांना सरकारी बांधकाम, रस्ते दुरुस्ती करणे, सरकारी गवत, करणे, इनामदार, जाहागीरदार देशमुख इत्यादी महत्वाच्या वतनदारांच्या घरी वेठबिगार असत त्यांच्याकडून सर्व प्रकारची कामे करून घेतली जात. छत्रपती पेशवे सरदार जेव्हा प्रवास शिकार जात असत, तेव्हा तेव्हा त्यांच्या प्रवासाची, राहण्याची साहित्याची, जेवणखान व पाण्याची सोय करण्यासाठी सुतार, गुरव व लोहार जातीतील लोकांना करावी लागे. किंवा करत असे.

6 दास-दासी -

पेशवाई काळात महाराष्ट्रात दास-दासीची पद्धत होती. दास-दासींना साधारणतः गुलामाप्रमाणे वागविले जात. घरगुती कामकाज दास व दासी ठेवत असत. पेशवेकाळात दासाची किंमत 125-150 होती, तर दासाची किंमत 60-70 रु होती.

7) स्त्रीजीवन -

१७ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रातील समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान होती. मालमत्तेचा अधिकार फक्त पुरुषाला होता.

(अ) सती पद्धती
(ब) बालविवाह
(क) विधवा विवाहस बंदी
(ड) केशवपण
(इ) बहुपत्नीकत्व

याशिवाय या काळात स्त्रीजीवनाशी निगडीत अनेक रूढी होत्या. बालविवाह सुद्धा होता. महाराष्ट्रात इंग्रजांची राजवट सुरु झाली तेव्हा येथील समाज व आधुनिक वैज्ञानिक व बुद्धिप्रामाण्यवादी विचारांपासून शेकडो योजना दूर होता. मूलभूत स्वातंत्र्य सामाजिक समता, बंधुभाव पुरोगामी विचार या बाबी स्वीकारण्यास या समाजाची तयारी नव्हती.